ePaper

आम्ही जर बोललो तर पळता भुई थोडी होईल: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



| वर्ष - 7 । अंक -73 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पुण्यात कोणाची 'दादा'गिरी चालणार!
- वायुगळती रोखण्यासाठी 'मॉक ड्रील'!!
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!

www .mahaenews.com । शुक्रवार , दिनांक 14जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पाणीपट्टी वसुलीसाठी 'देशमुख पॅटर्न'!

## »आयुक्त शेखर सिंह यांचा आदेश : कर संकलन विभागाची जबाबदार वाढवली!

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इतिहासात कर संकलन विभागाची 'रेकॉर्ड ब्रेक' वसुली यावर्षी झाली. या विभागात सूसुत्रता आणून मिळकत कर वसुलीचा उच्चांक करीत महापालिका तिजोरीत 'गल्ला' वाढवणारे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यावर आता पाणी पट्टी वसुलीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे पाणीपट्टी वसुलीसाठी आता 'देशमुख पॅटर्न' पहायला मिळणार आहे.**

महापालिका पाणी पुरवठा विभागामार्फत खासगी एजन्सी मार्फत बिलांचे रिडींग घेणे व बिलवाटप करण्याचे काम दिले जाते. त्यानंतर तांत्रिक कर्मचाऱ्यांकडून पाणीपट्टी वसुली करण्यात येते. पाणी पुरवठा विषयक तांत्रिक कामकाज, प्रकल्पाची कामे सांभाळून देखभाल- दुरूस्ती करणे, तक्रार निवारण करणे, पाणी पुरवठा विषयक ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष येणाऱ्या तक्रारींचे ठराविक वेळेत निराकरण करणे, तांत्रिक कामाचा आवाका अतिशय जास्त असल्यामुळे पाणीपट्टी वसुली अपेक्षीत परिणामकारकपणे होत नाही.

त्यामुळे पाणीपट्टी वसुलीमध्ये सातत्य राखून पाणीपुरवठा यंत्रणा भविष्यात आर्थिकदृष्टया अधिक सक्षम करणे, महसुली वृद्धीदरामध्ये




वाढ करणे, पाणीपट्टीची मागील थकबाकी तसेच वसुलीचे प्रमाण वाढवण्यासाठी मोहीम राबवण्यासाठी पाणीपट्टी संकलनाचे काम कर संकलन विभागाकडे सोपवण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतला आहे.





### 'मिळकती सील' नंतर आता नळजोड कटिंग कार्यक्रम...



»मिळकतकर भरण्याबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या मिळकतधारकांना धक्का देत सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी मिळकती सील करण्याचा धडाका लावला होता. त्यामुळे मिळकतकर वसुली विक्रमी झाली. त्याच धर्तीवर आता पाणीपट्टी वसुलीकामी थकबाकीदारांचे नळजोड तोडण्याचे अधिकार कर संकलन विभागाला मिळाले आहेत. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ पाणी पुरवठा उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे पाणीपट्टी न भरता प्रशासनाला वेठीस धरणाऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवण्याची भूमिका कर संकलन विभाग घेणार आहे.

# शहरात 'पीओपी'च्या गणेशमूर्ती बनविण्यास बंदी!

## » आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांचा निर्णय : कायदेशीर कारवाईचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात गणपती मूर्ती बनवणारे कारागीर, मूर्तिकार व उत्पादक यांना प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी)पासून मूर्ती बनविण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मूर्ती बनविल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात मूर्तीकारांना काळजी घ्यावी लागणार आहे.**



वास्तविक, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १२ मे २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे. सर्व कारागीर, मूर्तिकार तसेच उत्पादकांनी केवळ पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या नैसर्गिक रंग वापरून पाण्यात सहज विरघळणाऱ्या मूर्तींची निर्मिती करावी. मूर्ती बनविणे अथवा विक्री करण्यासाठी पालिकेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे, असे आयुक्तांनी म्हटले आहे.

तसेच, नोंदणी न केलेल्या कारागीर, मूर्तिकार व उत्पादक यांना मूर्ती विक्री स्टॉलला पालिका परवानगी देणार नाही. विनापरवाना अनधिकृतपणे मूर्ती विक्री करणाऱ्या दुकानदार व व्यावसायिकांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

### महापालिका आयुक्तांचे आवाहन...



»मूर्ती तयार करणाऱ्या अथवा विक्री करणाऱ्या कारागीर, मूर्तिकार, उत्पादक यांनी याबाबतची परवानगी घेण्याकरीता पालिकेच्या उद्योगधंदा व परवाना विभागाकडे अर्ज करावा. परवानगीची एक प्रत पर्यावरणपूरक मूर्ती विक्रीच्या दुकान किंवा स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे, असे आयुक्तांनी आदेशात नमूद केले आहे. नागरिकांनी केवळ पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या नैसर्गिक रंग वापरून पाण्यात सहज विरघळणाऱ्या पर्यावरणपूरक मूर्ती व सजावटीचे पूजा साहित्य वापरून गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

# पुण्यात कोणाची 'दादा'गिरी चालणार?

## अजितदादांच्या एन्ट्रीने चंद्रकांत पाटलांची खुर्ची धोक्यात?

### भाजपच्या चंद्रकांत दादा पाटलांचं पद धोक्यात?

। पुणे/ जेजुरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर राज्य मंत्रिमंडळात समावेश झालेल्या वरिष्ठ मंत्र्यांमुळे पूर्वीच्या अनेक मंत्र्यांची चांगलीच पंचाईत होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाने पुण्याच्या पालकमंत्रिपदावर दावा सांगितला आहे. त्यामुळे विद्यमान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे काय होणार, असा प्रश्न उभा ठाकला आहे.**

अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली अनेक आमदारांनी महायुती सरकारमध्ये प्रवेश केला. पवार यांच्यासह छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ आदी मंत्र्यांचा शपथविधीही पार पडला. आता नव्याने मंत्रिमंडळाचा खांदेपालट आणि विस्तार यांची प्रतीक्षा आहे.

दरम्यान, या वरिष्ठ आणि अनुभवी नेत्यांच्या मंत्रिमंडळातील सहभागामुळे अनेक विद्यमान मंत्र्यांची कुचंबणा होणार असल्याचे सांगण्यात येते.असाच एक पेच पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा निर्माण झाला आहे. चंद्रकांत पाटील यांच्या तुलनेत अजित पवार सर्वच बाजूंनी वरचढ असून, त्यांनी यापूर्वी अनेकदा पुण्याचे पालकमंत्रिपद भूषवले आहे. पालकमंत्री जिल्हा नियोजन मंडळाचे अध्यक्ष असतात.

त्यामुळे त्यांना जिल्ह्यावर राजकीय आणि प्रशासकीय नियंत्रण ठेवता येते. त्यामुळे अजित पवार गटाकडून पुण्याचे पालकमंत्रिपद मागितले जाण्याची दाट शक्यता आहे.

तसे झाल्यास पाटील यांची चांगलीच अडचण होणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आपल्याकडील एखादे पालकमंत्रिपद सोडण्यास तयार होईल का, अशी चर्चा रंगली आहे. या गोंधळातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या वरिष्ठांना सन्मानजनक तोडगा काढावा लागणार आहे.



### पालकमंत्रिपदाचा निर्णय आज?

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ आमदारांचा शपथविधी झाला असला, तरी अद्याप खातेवाटप आणि पालकमंत्र्यांची नियुक्ती झालेली नाही. अजित पवार आणि दिलीप वळसे पाटील हे दोघे मंत्रिमंडळात पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यामुळे विद्यमान पालकमंत्र्यांची वरिष्ठ मंत्र्यांमुळे पंचाईत होणार आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार येत्या काही तासांत अपेक्षित असून, त्यानंतर खातेवाटप आणि पालकमंत्रिपदेही जाहीर केली जाणार आहे. पुण्यातील सर्वच मंत्री 'हेविवेट' असल्याने आगामी काळात प्रशासनाला काम करताना कसरत करावी लागणार आहे.

### राजशिष्टाचाराचे काय ?

पुण्याच्या पालकमंत्रिपदावरून राजशिष्टाचाराचाही मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्रिपद घटनात्मक नसले, तरी त्याचा राजकीय मान आणि वजन मोठे असते. अशा वेळी चंद्रकांत पाटील पालकमंत्रिपदी राहिल्यास त्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत उपमुख्यमंत्रिपदावरील व्यक्ती केवळ एक सदस्य म्हणून कशी सहभागी होणार, असा प्रश्न अजित पवार यांच्या समर्थकांकडून विचारण्यात येत आहे.

# पुण्यात एसटीबसचा अपघात

## 35 प्रवाशांसह बस 20 फूट खोल कोसळली

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याण येथून भीमाशंकर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसला अपघात झाला. पुणे जिल्ह्यात आंबेगाव तालुक्यातील गिरवली येथे असणाऱ्या ओढायावरून बस थेट वीस फूट खोल खाली कोसळली आहे. या अपघातात पाच जण जखमी झाले असून बसमधून एकूण ३५ जण प्रवास करत होते. सुदैवाने सर्वजण सुखरूप असल्याची माहिती मिळत आहे. आज सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास हा अपघातात घडला. प्रशासनाकडून तात्काळ मदत मिळाल्याने पुढील दुर्घटना टळली आहे.**

याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, कल्याण येथून भीमाशंकर येथे निघालेल्या बस चालकाचे नियंत्रण आंबेगाव तालुक्यातील गिरवली गावाजवळ असणाऱ्या ओढ्यात सुटले. त्यामुळे बस वीस फूट खोल दरीत कोसळली.

यात पाच जण जखमी झाले आहेत. तर अन्य सुखरूप आहेत. बसमध्ये एकूण ३५ प्रवाशी प्रवास करत होते.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक नागरिक मदतीसाठी दाखल झाले. तसेच पाच रुग्णवाहिका देखील दाखल झाल्या असून जखमींना घोडेगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी दाखवलेली सतर्कता यामुळे या जखमींना वेळेत उपचार मिळू शकले.




### चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात

महामंडळाची ही बस कल्याण येथून भीमाशंकला जात असताना हा अपघात घडला आहे. सुदैवाने यामध्ये कुणीही गंभीर जखमी झाले नाही. तर आरोग्य विभागाच्याही रूग्णवाहिका तात्काळ दाखल झाल्याने मोठा धोका टळला आहे. एसटी बसच्या अपघातात दिवसेंदिवस वाढ होताना पहायला मिळत आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला असल्याची माहिती समोर येत असून पुढील कारवाई करण्याचे काम सुरू आहे. या घटनेने एकच धावपळ उडाली होती.

# १३३ सहायक प्राध्यापकांची भरती

। पुणे। महाईन्यूज । ।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. त्यामुळे विद्यापीठाने १३३ जागांवर सहायक प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या जवळपास ५५ टक्के जागा रिक्त आहेत. शासनाकडून प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवली जात नसल्याने त्याचा परिणाम शैक्षणिक कामकाजावर होते. तसेच नुकत्याच जाहीर झालेल्या विविध क्रमवारीतील विद्यापीठाच्या स्थानावरही त्याचा परिणाम दिसून आला. गेल्यावर्षीही विद्यापीठाने विद्यापीठ निधीतून कंत्राटी प्राध्यापकांची नियुक्ती केली होती. आता यंदाही पुन्हा ही प्रक्रिया राबवली जात आहे. कंत्राटी भरतीमुळे विद्यापीठ निधीवर ताण निर्माण होत आहे.विद्यापीठाने



सहायक प्राध्यापकांच्या १३३ जागांवर कंत्राटी नियुक्तीचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विज्ञान आणि तंत्रज्ञान, मानव्यविज्ञान, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील चाळीस शैक्षणिक विभागांतील जागांसाठी निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. या पदांसाठी दरमहा ४० हजार रुपये वेतन दिले जाणार आहे. निवड होणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती ३१ मे २०२४पर्यंत असेल. या जागांसाठी अर्ज करण्याची मुदत २० जुलै आहे. भरती प्रक्रियेअंतर्गत आरक्षणनिहाय जागा, पात्रता, नियम-अटी याबाबतच्या सूचना माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

# वायुगळती रोखण्यासाठी 'मॉक ड्रील'!

## टाटा मोटर्स कंपनीत थरार : महापालिका प्रशासनाची यंत्रणा सज्ज

### जिवीत आणि वित्त हानी होऊ नये याची दक्षता घेतली गेली पाहिजे : इंदलकर

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**आपत्कालीन परिस्थितीमध्ये कमीत कमी कालावधीत संकट कसे टाळता येईल हे प्रत्येकाचे लक्ष्य असले पाहिजे तसेच जिवीत आणि वित्त हानी होऊ नये याची दक्षता घेतली गेली पाहिजे, असे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले.**



महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापन विभाग, औद्योगिक सुरक्षा महामंडळ आणि टाटा मोटर्स यांच्या वतीने औद्योगिक वायुगळती रोखण्याच्या दृष्टीने 'ऑन साईट जॉईंट मॉक ड्रील'चे आयोजन चिंचवड येथील टाटा मोटर्स कंपनीत करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

या मॉक ड्रीलला आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, अग्निशमन अधिकारी उदय वानखेडे, औद्योगिक सुरक्षा महामंडळ सहसंचालक संजय गिरी, टाटा मोटर्स सुरक्षा अधिकारी राकेश पांडे, कारखाना व्यवस्थापक प्रशांत जोशी, आपत्ती नियंत्रक शशिन पाटील, टाटा मोटर्स कामगार संघटनेचे प्रतिनिधी संतोष संकपाळ, अबिद सय्यद तसेच कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

यापुढेही आयुक्त शेखर सिंह यांच्या सुचनेनुसार एन. डी. आर. एफ आणि पोलिस दलाच्या सहभागातून ऑफ साईट आणि ऑन साईट मॉक ड्रील दर तीन ते चार महिन्यांनी घेण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे. यावेळी टाटा मोटर्सचे कारखाना व्यवस्थापक प्रशांत जोशी यांनी या मॉक ड्रीलचे आयोजन केल्याबद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले.

### नागरिकांना प्रशिक्षण देणार...

आपत्कालीन परिस्थितीमध्ये संकटावर कशा प्रकारे मात करता येईल हा या मॉक ड्रीलचा उद्देश होता. अशी परिस्थिती जर निर्माण झाली तर किती कालावधीमध्ये अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचू शकते तसेच इतर यंत्रणा किती कालावधीमध्ये प्रतिसाद देऊ शकतात हे समजून घेणेही तितकेच महत्वाचे आहे. दर तीन महिन्याला आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल तसेच यामध्ये बाकीच्या कंपन्यांचाही समावेश असणार आहे. यामध्ये स्वयंसेवकांचेही सहकार्य लाभणार असून सामान्य नागरिकांना अग्निशमन विभागाकडून आपातकालीन संकटांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे, असे सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले.

### कंपन्यांमध्ये जागरुकता झाली पाहिजे...

आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल म्हणाले, या मॉक ड्रीलबद्दल कोणालाही माहिती देण्यात आली नव्हती. सगळ्या अग्निशमन अधिकारी, कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीत इथे बोलावण्यात आले होते. जर अशी परिस्थिती ओढावली तर अग्निशमन दल किंवा वैद्यकीय दल आणि संबंधित यंत्रणेला घटनास्थळी पोहोचण्यास आणि परिस्थिती आटोक्यात आणण्यास किती वेळ लागतो हे पाहण्यासाठी आज या मॉक ड्रीलचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका आणि टाटा मोटर्सच्या अग्निशमन दलाने खुप चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला. पुढेही महापालिका अशा कार्यक्रमांचे आयोजन करत राहील जेणेकरून शहरातील कंपन्यांमध्ये जागरूकता निर्माण होईल आणि संकटकाळी परिस्थिती कशी हाताळावी याची त्यांना पुर्वकल्पना येईल.

---

# समाज विकास'चे अजय चारठाणकर यांना पदोन्नती!

## वेतनश्रेणीमध्ये वाढ : नगरविकास विभागाचा आदेश

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी-चिंचवड महापालिका समाज विकास विभागाचे उपायुक्त अजय चारठाणकर यांना पदोन्नती मिळाली आहे. त्यांची महापालिकेतच पदस्थापना झाली असून, वेतनश्रेणीमध्ये वाढ झाली आहे. राज्याच्या नगरविकास विभागाने तसे आदेश दिले आहेत.**

समाज विकास विभागाचे उपायुक्त म्हणून महापालिका हद्दीतील महिला व बालकांचे कल्याण, दारिद्र रेषेखालील व्यक्ती, गरीब, अपंग व मागासवर्गीय व्यक्तींच्या विकासाकरिता कल्याणकारी योजना शासकीय नियमानुसार राबवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. महाराष्ट्र शासकीय गट- अ व गट- ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियमानुसार, राज्य शासनाच्या आदेश काढले आहेत.

नगर सचिव विभागाच्या उप सचिव प्रियांका कुलकर्णी- छापवाले यांनी पदोन्नतीबाबत आदेश काढले आहेत.

### समाज विकास विभागाला 'चालना'

उपायुक्त अजय चारठाणकर यांनी समाज विकास विभागाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून परंपरागतपणे चालू असलेल्या कल्याणकारी योजनांमधील त्रूटी दूर करुन प्रभावीपणे राबवण्याची भूमिका घेतली आहे. कोविड महामारीमध्ये विधवा झालेल्या महिलांना रोजगार आणि आत्मनिर्भर करण्यासाठी 'नवी दिशा' सारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प शहरात राबवण्यात येत आहे. यासह तृतीयपंथ नागरिकांना महापालिका सुरक्षा विभागात रुजू करण्याचा पथदर्शी निर्णय तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्या काळात घेण्यात आला. त्याची मूळ संकल्पना अजय चारठाणकर यांनी मांडली. असा निर्णय घेणारी पिंपरी-चिंचवड महापालिका महाराष्ट्रात पहिली ठरली आहे. आगामी काळात आर्थिक दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

---

# जुनी सांगवी येथील गॅस शवदाहिनी २० जुलैपर्यंत बंद

।पुणे। महाईन्यूज ।।



पिंपरी : जुनी सांगवी येथील महापालिकेची गॅस दाहिनी दुरूस्तीच्या कामासाठी २० जुलैपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे अशी माहिती ह क्षेत्रीय कार्यालयातील विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता दिलीप धुमाळ यांनी दिली आहे. जुनी सांगवी परिसरात दापोडी, फुगेवाडी, सांगवी परिसरातील नागरिक अंत्यविधीसाठी येतात. याठिकाणी महापालिकेने गॅस दाहिनी सुरू केली आहे.

या गॅस दाहिनीच्या दुरूस्तीची आवश्यकता असल्याने दि.१४ जुलै ते २० जुलै या कालावधीत ही दुरूस्ती केली जाणार आहे त्यामुळे गॅस दाहिनी बंद ठेवली जाईल. दुरूस्तीच्या कामांमध्ये प्रामुख्याने रिफ्रॅक्टरी बदलणे, भट्टीचा दरवाजा दुरूस्त करणे, बर्नर, वायर्सची कामे तसेच इतर अनुषंगिक कामे केली जाणार आहेत. या गॅस दाहिनीचा चालन देखभालीचा ठेका मेसर्स कल्याणी एंटरप्राईझेस यांच्याकडे असून ही सर्व कामे त्या एजन्सीकडून केली जाणार आहेत. या कामातील रिफ्रॅक्टरी बदलण्याच्या कामास अधिक वेळ लागणार असून त्यासाठी गॅस दाहिनी कमीत कमी १ आठवडा बंद ठेवावी लागणार आहे. ही सर्व कामे संबंधित एजन्सीकडून केली जाणार आहेत. नागरिकांनी याबाबतची नोंद घ्यावी, असे महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# विंडीज, झिंबाब्वे क्रिकेटची वाताहत!




**एक दिवसीय क्रिकेटचे पहिले दोन विश्वचषक ज्यांनी जिंकले तो वेस्ट इंडिजचा क्रिकेट संघ यंदाच्या विश्वचषकासाठी पात्रही ठरू शकलेला नाही. विंडीजसोबत आफ्रिकेतील तगडा संघ असलेला झिम्बाब्वेही पात्रता फेरीत बाद झालाय. ही वाताहत एका दिवसात घडलेली नाही. तिथली राजकीय, सामाजिक परिस्थितीही याला कारणीभूत आहे. दुर्धर आजार टप्प्यटप्प्याने बळावत जातो तसंच हे घडलंय.**

ज्यांच्या क्रिकेट साम्राज्यावरून ऐंशी आणि नव्वदच्या दशकात सूर्य मावळत नव्हता, तो वेस्ट इंडिजचा संघ यंदाच्या विश्वचषकात खेळणार नाही. तब्बल ४८ वर्षांनंतर ही सनसनाटी घटना घडत आहे. झिम्बाब्वेत नुकत्याच पार पडलेल्या पात्रता फ़ेरीतच शाय होपच्या नेतृत्वाखालील विंडीजच्या संघाला गाशा गुंडाळावा लागला.



अमेरिका, नेपाळ, नेदरलँडस् यांसारख्या क्रिकेटचा श्रीगणेशा केलेल्या संघाविरुद्ध पात्रता फेरीतील सामने खेळण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली. तथापि, तिथेही त्यांच्या पदरी निराशाच पडली. क्रिकेट विश्वाला बसलेला हा मोठा धक्काच म्हटला पाहिजे. जिथे फुले वेचली, तिथे गोवऱ्या वेचायची वेळ या एकेकाळच्या दादा संघावर आली आहे. विश्वचषक पात्रता फेरीच्या सुपर सिक्स टप्प्यात स्कॉटलँडकडून झालेला पराभव म्हणजे विंडीजसाठी शवपेटीवरील अखेरचा खिळा ठरला. यामुळे भारतात ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर यादरम्यान होऊ घातलेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत विंडीजच्या खेळाडूना प्रेक्षकांत बसून सामने पाहावे लागतील.

सुवर्णमयी भूतकाळ असलेल्या वेस्ट इंडिजने १९७५ आणि १९७९ मधे झळाळत्या बिश्वचषकावर नाव कोरले होते. १९८३ मधे भारताने त्यांच्यावर रोमांचकारी विजय मिळवून क्रिकेट जगतात चमत्कार घडविला होता. तरीदेखील विंडीजचा संघ तेव्हा उपविजेता ठरला होता. त्यानंतर मात्र या संघाला उतरती कळा लागली. आता तर त्यांनी तळ गाठला आहे.

वेस्ट इंडिजला विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता सामने खेळावे लागले याचे कारण म्हणजे ते सुपर लीगमधे नवव्या स्थानावर होते. पात्रता फेरीमधे अ गटात झिम्बाब्वे, नेदरलँड, अमेरिका आणि नेपाळसह विंडीजचा समावेश करण्यात आला होता. पात्रता फेरीची सुरुवात त्यांनी अमेरिका आणि नेपाळविरुद्ध विजयाने केली.

तथापि, नंतर झिम्बाब्वे आणि नेदरलँडकडून त्यांना पराभव पत्करावा लागला. अर्थात, येथे प्रश्न विंडीजचा कसा पराभव झाला हा नाही. मुख्य मुद्दा असा आहे की, या धक्क्यातून हा संघ बाहेर कसा येणार? तरराष्ट्रीय पातळीवर विंडीज क्रिकेटची वाताहत झाली असली, तरी हे सगळे एका फटक्यात घडलेले नाही. दुर्धर आजार जसा टप्प्याटप्प्याने बळावत जातो, तसाच प्रकार कॅरेबियन क्रिकेटमधे पाहायला मिळतो. विंडीजचे आव्हान पात्रता फेरीतच आटोपल्यानंतर भारताचा धडाकेबाज माजी फलंदाज वीरेंद्र सेहवाग याने केलेल्या ट्विटची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली. तो म्हणतो, वेस्ट इंडिजचे वर्ल्ड कपसाठी क्वालिफाय न होणे ही लाजिरवाणी बाब आहे. फक्त गुणवत्ता असून चालत नाही, हे यातून दिसून येते. अजूनही लक्ष केंद्रित करण्याची, चांगल्या व्यवस्थापनाची गरज या संघाला आहे.

क्रिकेट प्रशासकांचा कारभार राजकारणमुक्त असायला हवा. यातील दिलासादायक बाब म्हणजे, आता यापेक्षा इथून त्यांना आणखी खाली जाता येणार नाही. एखादे भेदक हास्यचित्र अनेक बातम्या आणि लेखांपेक्षाही कसे प्रभावी 'ठरू शकते त्याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे सेहवागचे हे जळजळीत ट्विट. शाय होप याने स्कॉटलँडकडून झालेल्या पराभवाचे विश्लेषण करताना संघातील दुखरी नस समोर आणली. तो म्हणतो, कोणताही सामना खेळताना एखादा झेल सुटणे किंवा क्षेत्ररक्षणात चुका होणे हा खेळाचाच अविभाज्य भाग आहे. जगातील नामवंत खेळाडूसुद्धा अगदी सोपा वाटणारे झेल सोडतात. मात्र, तुम्ही जर कोणत्याही तयारीविना मैदानात उतरलात तर तुम्हाला यश मिळणे केवळ अशक्य असते. मी कोणत्याही एका खेळाडूला यासाठी दोष देणार नाही. हे सांघिक अपयश आहे. त्यामुळे प्रत्येकानेच आपण कुठून कुठे चाललो आहोत यावर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

## संपादकीय »

# अब गोविंद ना आएंगे!

***समाजातील सर्व यंत्रणा आपापल्या मर्यादांचे उल्लंघन करतात, तेव्हा घटनेचे सर्वशक्तिमान द्वारपाल असलेल्या सर्वोच्च न्यायालयाने किती मर्यादा पाळावी याची चर्चा तरी आपण करणार का?***

अलीकडे यास काय म्हणावे हे कळेनासे झाले आहे. उदाहरण म्हणून सर्वोच्च न्यायालयाने सक्तवसुली संचालनालयाचे, म्हणजे विश्वविख्यात 'ईडी'चे प्रमुख संजय कुमार मिश्रा यांच्याबाबत दिलेला निर्णय पाहा. केंद्र सत्ताधाऱ्यांसाठी हे सक्तवसुली संचालनालय सध्या किती महत्त्वाचे आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. गावागावांतील आया लहान मुले रात्री झोपेनाशी झाली की त्यांना गब्बर सिंगची भीती घालत असा एक संवाद 'शोले' चित्रपटात आहे.

तद्वत विरोधी पक्षीय फुटेनासे झाले की अलीकडे या ईडीची भीती घातली जाते, असे म्हणतात. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेस मदत झाली असेल/नसेल पण या ईडीने भारतीय राजकारणास नवीनच दिशा दिली हे नाकबूल करता येणार नाही. त्यामुळे या अत्यंत महत्त्वाच्या यंत्रणेच्या प्रमुखपदी मिश्रा यांस केंद्र सरकारने दोन वेळा मुदतवाढ दिली.

**दरवर्षी पाऊसपाण्याचं गणित बिघडत चाललंय. यंदा पावसानं जूनअखेरपर्यंत वाट पाहायला लावली. हवामानबदलाचे परिणाम आता मान्सूनच्या वाऱ्यांवरही पडू लागले आहेत. दुसरीकडे जे पाणी आकाशातून पडतंय, त्याचं आपलं नियोजनही चुकतंय. वाढतं शहरीकरणं, जलस्रोतांचे नुकसान आणि पाण्याचा गैरवापर यामुळे देशातील पाण्याचा प्रश्न बिकट होत चाललाय. एवढं होऊनही, या प्रश्नाचं गांभीर्यही पुरतं कळलेलं नाही.**

# पाऊस आलाय, पण पाण्याचं गणित बिघडतंय

जूनच्या अखेरीस पाऊस आलाय. या लांबलेल्या मान्सूनमुळे यावर्षी पाण्यासंदर्भातील चिंता पुन्हा एकदा अधोरेखित केलीय. दरवर्षी अनेक गावाखेड्यांच्या, शहरांच्या डोक्यावर पाणी टंचाईची समस्या वाढू लागली आहे. हे जलसंकट गंभीर असले तरी हे आज उद्भवलेले नाही. २०१८ सालच्या नीती आयोगाच्या समग्र जल निर्देशांकामधे ६० कोटी लोक म्हणजे भारताची निम्मी लोकसंख्या पाणी टंचाईला सामोरी जात असल्याचे नमूद करण्यात आले होते.

दुसरीकडे, उपलब्ध पाण्यापैकी ७० टक्के पाणी दूषित झाले आहे. परिणामी, २०३० पर्यंत भारताच्या ४० टक्के लोकसंख्येला पिण्याचे स्वच्छ पाणीच उपलब्ध होऊ शकणार नाही, अशी माहिती समोर आली आहे. भविष्यकाळाचे हे चित्र आपल्याला घाबरवून सोडणारे आहे. तरीही त्यावर ठोस पावलं उचलली जात नाहीयेत. परंतु जर मनात आणले, तर हे चित्र



आपण बदलू शकतो. वस्तुतः पाणी हे एक असे नैसर्गिक संसाधन आहे, ज्याचे पुनर्भरण करणे आपल्याला शक्य असते. या कामात पाऊस आणि हिमवृष्टी आपल्याला मदत करते. समजून घेण्याजोगी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, आपण शेतीवाडीत पाण्याचा वापर प्रचंड प्रमाणात करत असलो, तरी पाण्याचा कौशल्याने वापर करण्यास आपण शिकलेलो नाही.

पाण्याचे 'रिसायकलिंग' म्हणजेच 'पाण्याचा पुनर्वापर' करणे शक्य होत नाही म्हणूनच आपला कार्यक्रम स्पष्ट असायला हवा. आपल्याला पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करणे शिकायला हवे. हीच सवय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उपयोगात आणायला हवी. असे केले तरच आपण देशात पाण्याची उपलब्धता वाढवू शकू. भारतासारख्या जल-बायू परिवर्तनाची जोखीम असलेल्या देशात पाऊस जास्त होतो आणि हवामानातील बदल वेगाने घडताना दिसतात. त्यामुळे आपल्याला हाच कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. पावसाचा प्रत्येक थेंब अडवून आपण आपला भूजलस्तर वाढवू शकतो.

दुसरा आणि महत्त्वाचा कार्यक्रम, जो आपण राबवायला हवा. तो असा, पाण्याचा कौशल्यपूर्ण रीतीने बापर करून आपल्याला पाण्याच्या साठ्यांमधे वाढ करावी लागेल. जास्तीत जास्त पाण्याचा उपयोग आपल्याला शेतीसाठी आणि अन्य कारणांसाठी करून घ्यायला हवा. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, पाण्याचा वापर कमी करण्याच्या दृष्टीने आपल्याला मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करावे लागतील. शेतीच्या संदर्भात या कार्यक्रमाचा अर्थ असा की, आपल्याला पीकपद्धती बदलाव्या लागतील.

## ।। अभंगवाणी ।।



गरुडाचें वारिकें कासे पीतांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥

बरवया बरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)



# मै झुकेगा नही!

## » राज्यामध्ये सध्या व्यभिचार सुरू आहे : राज

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यामध्ये सध्या व्यभिचार सुरू आहे, तशीच वेळ आली तर मी घरी बसेल मात्र, तडजोड करणार नाही. अशी स्पष्ट भूमिका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी मांडलेल्या हे मत महत्त्वाचे मानले जात आहे.**

येत्या पंधरा दिवसात मी विविध ठिकाणी मिळावे घेणार असून त्यात भूमिका स्पष्ट करणार असल्याचे देखील राज ठाकरे यांनी सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतील सर्व पदाधिकाऱ्यांना पक्ष सांगेल ते काम करावे लागेल. अन्यथा त्यांना पदावर राहता येणार नाही, असा थेट इशारा देखील राज ठाकरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना दिला.

राज यांनी या माध्यमातून सर्व पदाधिकाऱ्यांना एकप्रमारे तंबी दिली आहे. राज ठाकरे सध्या कोकण दौऱ्यावर आहेत. यानिमित्त चिपळूण मध्ये त्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, त्या वेळी ते बोलत होते.

### तडजोड करणार नाही

» मला तडजोड करावी लागली तर मी घरात बसेल, पण तडजोड करणार नाही. असे स्पष्ट मत राज ठाकरे यांनी व्यक्त केले आहे. आगामी निवडणुकीच्या दृष्टिकोनातून राज ठाकरे यांनी व्यक्त केलेले मत महत्त्वाचे मानले जात आहे. आगामी लोकसभा निवडणूक का लढवावी? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना विचारला.

# अलिबाबा 40 चोरांसारखी परिस्थिती

## » तातडीने राष्ट्रपती राजवट लागू करा : पटोले

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यातील राजकीय वातावरण गढूळ झाले असून भाजपाच्या सत्तापिपासू वृत्तीने राज्यात शासन व प्रशासनही ठप्प आहे. जनतेला वाऱ्यावर सोडून देऊन मलाईदार खात्यासाठी साठमारी सुरु आहे. राज्यात अलिबाबा 40 चोरांसारखी परिस्थिती असून जनतेची तिजोरी लुटली जात आहे.**

दरम्यान नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, राज्यपाल व महामहिम राष्ट्रपती यांनी यात हस्तक्षेप करुन राज्यात तातडीने राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



### दुबार पेरणीचे संकट

» नाना पटोले म्हणाले की, राज्यातील काही भागात अजून पेरण्या झालेल्या नाहीत तर काही भागात दुबार पेरणीचे संकट आहे. शेतकऱ्यांना मदत जाहीर करुनही ती मिळालेली नाही. कृषी मंत्री बोगस पथक पाठवून लुटण्याचे काम करत आहेत. शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत, महागाई, बेरोजगारी, जनतेच्या प्रश्नावर सत्ताधारी पक्ष बोलत नाहीत, जनतेला वाऱ्यावर सोडून देण्यात आलेले आहे. काँग्रेस पक्ष जनतेच्या प्रश्नावर पावसाळी अधिवेशनात सरकारला जाब विचारेल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यात सध्या तमाशा सुरु असून महाराष्ट्राचा तमाशा करण्याचे हे पाप भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक करत आहे. भाजपाने महाराष्ट्राला कलंक लावला असून शाहु, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचाराचा महाराष्ट्र आज कुठे नेऊन ठेवला आहे? असा प्रश्न पडला आहे.नाना पटोले म्हणाले की, राज्यात सध्या जे सुरु आहे ते महाराष्ट्राला भूषणावह नाही. राज्यातील सरकार अस्थिर असून हे सरकार कधी जाईल हे सांगता येत नाही.

मलईदार खाती कोणाला मिळावीत यासाठी मारामारी सुरु आहे. कोणाला कोणते खाते मिळावे यात राज्यातील जनतेला स्वारस्य नाही. केंद्रातील भाजपा सरकार ईडी, सीबीआयची भिती दाखवून विरोधकांना दाबण्याचा प्रयत्न करत आहे.

# ठाकरेंनी जनादेशाची हत्या केली : फडणवीस

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

उद्धव ठाकरेंनी 2019 मध्ये जनादेशाची हत्या केली आहे. रात्रंदिवस युतीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विश्वास तोडण्याचे काम केले. त्यांनी माझ्या नव्हे, तर भाजपच्या पाठीत खंजिर खुपसला. मात्र, असा अन्याय ज्या-ज्या वेळी होईल, त्या-त्या वेळी एकनाथ शिंदे जन्माला येतील, असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला. भाजपच्या वतीने आयोजित मिशन 2024 पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी 2019 मध्ये युती तुटण्यामागील कारणे सांगत उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. तर आता नव्याने शिंदे यांच्या नेतृत्वात झालेल्या युतीवर कौतुकाचा वर्षात करत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी देखील केलेल्या युतीमागील निती सर्वांसमोर मांडली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 2019 साली भाजप-सेनेचे पूर्ण बहुमत आले होते. पण त्यावेळी काही लोकांनी त्यात खडा टाकला. आता काही लोक खोट्या शपथा घेत आहेत. उद्धव ठाकरे पोहरादेवीला जाऊन खोटी शपथ घेतली. तेव्हा त्यांनी देखील देवीपुढे मनातल्या मनात माफी मागितली असेल. कारण ते आता हतबल झाले आहेत. उद्धव ठाकरेंकडून वारंवार अडवणूक फडणवीस पुढे म्हणाले की, 2019 मध्ये आम्ही युतीची बोलणी अंतिम टप्प्यात होती. मात्र, उद्धव ठाकरे यांच्याकडून मुख्यमंत्री पदाची मागणी करण्यात आली. तेव्हा मी रात्री एक वाजता अमित शहांना फोन करून विचारणा केली. तेव्हा त्यांनी अगदी स्पष्ट सांगितले की, मुख्यमंत्री पद मिळणार नाही. तेव्हा त्यांनी उद्धवजी यांनी युती होणार नसल्याचे स्पष्ट केले आणि संवाद संपला. पण पुन्हा तीन दिवसाने एक मध्यस्त बोलायला आला. त्यांचे म्हणणे पालघरची जागा आम्हाला मिळाली पाहिजे.

# भाजपच्या मोर्चात गदारोळ

## पोलिसांकडून अश्रुधूर ; पोलिसांच्या मारहाणीत भाजप नेत्याचा मृत्यू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहार विधानसभेत सरकारविरोधात मोर्चा काढणाऱ्या भाजप नेत्यांवर पोलिसांनी लाठीमार केला. पोलिसांच्या मारहाणीत अनेक नेते व कार्यकर्ते जखमी झाले. जेहानाबादचे जिल्हा सरचिटणीस विजय सिंह यांचा मारहाणीमुळे मृत्यू झाला.**

माजी उपमुख्यमंत्री सुशील मोदी यांनी ट्विट करून याबाबत माहिती दिली आहे. पाटणा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे अधीक्षक आयएस ठाकूर यांनी मृत्यूच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. मृत्यूनंतर रुग्णालयाची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. विरोधी पक्षनेते विजय सिन्हा विधानसभेच्या आवारात धरणे धरून बसले. भाजपने मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. उद्या भाजप या प्रकरणी राजभवनावर मोर्चा काढणार आहे. पोलिसांनी भाजप नेते आणि कार्यकर्त्यांना डाकबंगला क्रॉसिंगवर रोखण्याचा प्रयत्न केला. गर्दी नियंत्रणात येत नसल्याने आधी वॉटर कॅननमधून पाण्याचा वर्षाव केला. अश्रुधुराचे गोळे सोडले. नंतर मारहाण केली. भाजप कार्यकर्त्यांनीही दगडफेक केली, तसेच पोलिसांवर मिरची स्प्रेने हल्ला केला. महाराजगंजचे खासदार जनार्दन सिग्रिवाल यांनाही पोलिसांनी लाठीमार करून धक्काबुक्की केली. यामध्ये ते जखमी झाले.

त्याच्या डोक्याला आणि चेहऱ्यावर जखमा झाल्या आहेत. जनार्दन सिंग सिग्रिवाल यांना IGIMS च्या खाजगी वॉर्ड-1 मध्ये दाखल करण्यात आले आहे.



### मुख्यमंत्री इतके लाचार ?

मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधत राज्यसभा खासदार सुशील मोदी म्हणाले की, आज तुमच्या उपमुख्यमंत्र्यांवर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. एक प्रकारे आरोप सिद्ध झाला आहे, पण तुम्ही बोलू शकत नाही. आज मुख्यमंत्री इतके लाचार आणि दुर्बल होतील, याचा विचार आम्ही कधीच केला नव्हता. मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा घेऊन स्वच्छतेचा दाखला द्यावा, अशी आमची इच्छा असल्याचे मोदी म्हणाले.

त्यांचे सीटी स्कॅन झाले आहे. खासदारांना वाय प्लस सुरक्षा आहे. मारहाणीच्या वेळी त्यांचे सुरक्षा कर्मचारीही उपस्थित होते. भाजपचे बिहार प्रदेशाध्यक्ष सम्राट चौधरी आणि पोलिसांमध्ये बाचाबाची झाली. विधानसभा समन्वयक डॉ.संजय मिश्रा यांचा शर्ट फाडून त्यांना मारहाण करण्यात आली. महिलांनाही पोलिसांनी सोडले नाही, असे ते म्हणाले. 11 हून अधिक जखमी नेते आणि कार्यकर्ते PMCH मध्ये दाखल आहेत. पोलिसांनी सम्राट चौधरीसह अनेक नेत्यांना ताब्यात घेतले आहे. बसमध्ये सगळ्यांना घेऊन गेले आणि नंतर सोडून दिले. माजी उपमुख्यमंत्री सुशील मोदी यांनी सांगितले की, जहानाबादचे सरचिटणीस विजय कुमार सिंह यांना पोलिसांनी मारहाण केली. त्यांना नर्सिंग होममध्ये दाखल करण्यात आले. डोक्याला गंभीर दुखापत झाली. तेथून त्यांना गंभीर अवस्थेत पीएमसीएचमध्ये नेण्यात आले, तेथे त्यांचा मृत्यू झाला. सुशील मोदी म्हणाले की, आमच्या महिला कार्यकर्त्यांनाही मारहाण करण्यात आली. इकडे पाटणाचे एसएसपी राजीव मिश्रा यांनी सांगितले की, विजय कुमार सिंह छज्जूबागमध्ये बेशुद्धावस्थेत सापडले होते. त्याच्या शरीरावर बाह्य जखमेच्या खुणा नाहीत. जमुईचे खासदार आणि एलजेपी (रा) चे राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांनी ट्विट करून लाठीचार्जवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले की, सत्तेच्या मुजोरीने ग्रासलेल्या मुख्यमंत्र्यांच्या पोलिसांनी बिहारींच्या हक्क आणि हक्कासाठी लढणाऱ्या निशस्त्र भाजप कार्यकर्त्याचा जीव घेतला. बिहारमध्ये ही अघोषित आणीबाणी नाही तर काय आहे? विजय सिंह यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करताना ते म्हणाले की, देवाने शोकाकुल कुटुंबीयांना धीर आणि हे दुःख सहन करण्याची शक्ती द्यावी. बिहार भाजपनेही या कार्यक्रमासंदर्भात प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. यामध्ये 10 लाख लोकांना नोकऱ्या देण्याचा हिशेब सरकारकडे मागितला आहे. प्रेस नोटच्या माध्यमातून सरकारला आतापर्यंत किती नियुक्त्या झाल्या आणि किती प्रक्रियेत आहेत, असा सवाल करण्यात आला आहे.

---

# चांद्रयान-३ मोहिमेकडे जगाचे लक्ष

## चांद्रयान-3 आज दुपारी 2.35 अंतराळात प्रक्षेपित

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या चांद्रयान-३ या मोहिमेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील अंतराळ केंद्रातून १४ जुलै रोजी दुपारी २.३५ वाजता 'चांद्रयान-३' अंतराळात प्रक्षेपित केले जाईल. ६ सप्टेंबर २०१९ च्या पहाटे चंद्रावर लँडर व रोव्हर आदळल्यानंतर चांद्रयान-२ मोहीम अंशत: अयशस्वी झाली होती. त्यामुळे भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.**



### चांद्रयान 2 मोहिमेत काय झालं होतं ?

चांद्रयान २ मोहिम ही जुलै २०१९ ला झाली आणि ऑगस्ट महिन्यात चंद्रावर उतरण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र वेग नियंत्रित न झाल्याने चंद्रावर उतरणारे लॅडर हे चंद्राच्या जमिनीवर आदळळे होते आणि त्याचे तुकडे झाले होते. मात्र या मोहिमेत चंद्राभोवती एक उपग्रह हा कक्षेत स्थिर करण्यात इस्त्रोला यश आले होते. हा उपग्रह चंद्राभोवती अजुनही फिरत असून त्याने चंद्राच्या जमिनीचा नकाशा तयार केला आहे.

चांद्रयान-३ च्या लँडरने २३ किंवा २४ ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर सॉफ्ट लँडिंग करणे अपेक्षित आहे. ६१५ कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या चांद्रयान -३ या मोहिमेचे उद्दिष्ट हे रोव्हरला चंद्राच्या कक्षेमध्ये पोचवणे व चंद्राच्या पृष्ठभागावर वैज्ञानिक प्रयोग करणे हे आहे. अवकाशात गेल्यावर CHANDRAYAAN-3 हे पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालायला सुरुवात करेल. प्रत्येक प्रदक्षिणा घालतांना पृथ्वीपासूनचे अंतर वाढवले जाईल आणि एका त्यानंतर एका विशिष्ट अंतरावरुन ते चंद्राकडे रवाना होईल.

चंद्राच्या कक्षेत पोहचल्यावर काही दिवस चंद्राभोवती प्रदक्षिणा घातल्यावर मगच CHANDRAYAAN-3 हे चंद्रावर उतरणार आहे. चंद्रावर अलगद उतरल्यावर लँडरमधून रोव्हर हा प्रत्यक्ष चंद्राच्या जमिनीवर संचार करणार आहे. या मोहिमेतून चंद्राचा प्रत्यक्ष अभ्यास केला जाणार आहे.राष्ट्रीय अंतराळ संस्थेने नागरिकांना चांद्रयान-३ चे प्रक्षेपण पाहण्यासाठी आमंत्रित केले आहे. नागरिकांना हे थेट प्रक्षेपण HTTPS://LVG.SHAR.GOV.IN/VSCREGISTRATION या लिंकवर नोंदणी करून SDSC-SHAR, श्रीहरिकोटा येथील लॉन्च व्ह्यू गॅलरीतून पाहता येणार आहे.

---

# कोळसा घोटाळ्यात विजय दर्डा, दोषी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगडमधील कोळसा खाण वाटपात झालेल्या घोटाळ्याप्रकरणी दिल्ली विशेष न्यायालयाने सर्व आरोपींना दोषी ठरवले आहे. या प्रकरणात माजी राज्यसभा खासदार विजय दर्डा आणि त्यांचा मुलगा देवेंद्र दर्डा यांच्यासह अधिकारी दोषी ठरले आहेत.**

या प्रकरणी 18 जुलै रोजी शिक्षा सुनावली जाणार असल्याचे कोर्टाने सांगितले आहे. दरम्यान, या प्रकरणी आम्ही सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याची प्रतिक्रिया विजय दर्डा यांनी दिव्य मराठी डिजिटलशी बोलताना दिली. दर्डा पिता पुत्रांबरोबरच या प्रकरणामध्ये माजी कोळसा सचिन एच.सी.गुप्ता, दोन वरिष्ठ अधिकारी के एस क्रोफा आणि के सी सामरिया तसेच, जेएलडी यवतमाळ एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक मनोज कुमार जैस्वाल यांचाही दोषींमध्ये समावेश आहे. विशेष न्यायालयाने त्यांना आयपीसीच्या कलम 120ब, 420 आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या इतर कलमांखाली दोषी ठरवले आहे. सर्वोच्च न्यायालयात आव्हान या प्रकरणी विजय दर्डा यांच्याशी संपर्क साधून त्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली. त्यावेळी विजय दर्डा यांनी, या प्रकरणी ते सर्वोच्च न्यायलयत आव्हान दिल्याची माहिती दिली. अजून निर्णयची कॉपी आम्हाला मिळालेली नाही. ती मिळाल्यानंतर वकील अभ्यास करतील आणि त्यानंतरच प्रतिक्रिया देता येईल.

# और प्यार हो गया!



सध्या बॉलिवूडमध्ये एका नव्या कपलची जोरदार चर्चा होत आहे. बॉलिवूडमधील सुपरहॉट अभिनेता आदित्य रॉय कपूर आणि अनन्या पांडे यांच्या डेटिंगच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून सोशल मिडियावर व्हायरल होत होत्या मा६ दोघांनीही याबद्दल काहीही प्रतिक्रिया दिली नव्हती. अनन्याचे आदित्यसोबतच्या प्रेमप्रकरणाची चर्चा पुन्हा सुरु झाली आहे. रिपोर्ट्समध्ये हे कपल गुपचूप एकमेकांना डेट करत असल्याचे समोर आले आहे. अलीकडेच आदित्य आणि अनन्या एकत्र एका संगीत कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी गेले होते. या जोडप्याची ही रोमँटिक म्युझिकल डेट सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. आता ही बातमी खरी असल्याचं समोर आलं आहे. सध्या अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर स्पेनमध्ये सुट्टीचा आनंद घेत आहेत. ज्याचा फोटो दोघांनी त्यांच्या इन्स्टा स्टोरीवर शेअर केला आहे. फोटोमध्ये दोघांचा चेहरा दिसत नसला तरी हे जोडपे स्पेनमध्ये एकाच ठिकाणी असल्याचे फोटोवरून स्पष्ट झाले आहे. सध्या दोघांचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. त्यातच पापाराझींच्या एका पेजनेही त्याचे फोटो शेयर केले आहे. 2022 मध्ये, आदित्य आणि अनन्या कृती सेनॉनच्या दिवाळी पार्टीत एकत्र दिसले होते. तेव्हापासून त्यांच्या अफेयरच्या बातम्या पसरल्या होत्या. मात्र या बातमीवर दोघांनी मौन पाळले होते तरी अनेकदा दोघांचे एकत्र फोटो सोशल मीडियावर व्हायरल होते. आदित्य आणि अनन्या पांडे यांच्यातील नात्याचा खुलासा सर्वप्रथम करण जोहरने त्याच्या टॉक शो कॉफी विथ करणमध्ये केला होता. डिसेंबर 2022 मध्येही दोघे एकत्र दिसले होते. त्यानंतर दोघेही एकत्र 'फिफा वर्ल्ड कप 2022' पाहण्यासाठी कतारला पोहोचले होते. अनन्याच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर ती आयुषमान खुरानासोबत 'ड्रीम गर्ल 2' मध्ये काम करत आहे. हा चित्रपट 25 ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. तर आदित्य रॉय कपूर 'मेट्रो इन दिनों' मध्ये सारा अली खान दिसेल.

# वैशाली अन् मैथिली पहिल्यांदाच एकत्र!

मराठी मनोरंजन विश्वातून एक गोड बातमी आता समोर आली आहे. अभिनय आणि संगीत यांचा आगळा वेगळा मिलाफ यानिमित्तानं दिसून येणार आहे. एकीकडे अभिनेत्री मैथिली आणि दुसरीकडे वैशाली यांची एक कलाकृती आता प्रेक्षकांसमोर येणार असल्याचे सांगितले जात आहे. आपल्या धडाडीच्या स्वभावातून अभिनेत्री मैथिली जावकर सतत काहीतरी करत असते. अभिनय आणि निर्मिती नंतर आता ती लेखन दिग्दर्शनाकडे वळली आहे. 'अशीच आहे चित्ता जोशी' या नाटकाच्या लेखन आणि दिग्दर्शनाची जबाबदारी घेतली आहे. मनोरंजना सोबतच, आपली महान संस्कृती व परंपरा यांची महती सांगणार हे नाटक आहे. या नाटकातून दिग्दर्शकीय पदार्पण करणाऱ्या मैथिलीला साथ मिळाली ती गायिका वैशाली सामंतची.गाण्यातून आणि संगीतातून आपलं नाणं खणखणीत वाजवणाऱ्या वैशालीने प्रथमच एका नाटकासाठी गीत संगीताची जबाबदारी सांभाळली. ह्या नाटकातील धाकड गीताला (थीम साँग) गायिका वैशाली हिने संगीत दिलंय, आणि स्वतः तेे गाणं गायलंय. या नाटकाच्या निमित्ताने मैथिलीच दिग्दर्शकीय पदार्पण आणि वैशालीच नाटकासाठी प्रथमच संगीत देणं हा योग 'अशीच आहे चित्ता जोशी' या नाटकाने जुळवून आणला आहे. या गाण्या विषयी बोलताना वैशाली म्हणते की, हे गाणं करताना खूप धमाल आली. आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या स्त्री पात्रासाठी अतिशय चपखल असं हे गाणं करताना एका स्त्री दिग्दर्शिकेचा दृष्टीकोन मला अधिक भावला. त्यामुळे हे गाणं आणि मैथिली सोबत काम करणं माझ्यासाठी ही खूप छान अनुभव होता.




# कंगनाचा 'तेजस' अडचणीत

बॉलीवुडची क्वीन कंगना रणौतचा आगामी तेजस सिनेमाची सर्वांना उत्सुकता आहे. कंगना रणौतचा टिकू वेड्स शेरु सिनेमा बॉक्स ऑफीसवर दणक्यात आपटला. कंगनाने काही दिवसांपुर्वी इमर्जन्सी या आगामी सिनेमाची झलक शेअर केली. पण काहीच दिवसांपुर्वी कंगनाने तिच्या आगामी तेजस सिनेमाची घोषणा केली त्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या. पण कंगनाचा हा सिनेमा आता वादाच्या भोवऱ्यात सापडलाय. कंगनाच्या सिनेमाच्या मेकर्सवर सिनेमातल्या अभिनेत्याने पैसे थकबाकीचा आरोप केलाय.तेजस चित्रपटासाठी काम केलेल्या मयंक मधुरने निर्माता त्याचे पैसे देत नसल्याचा दावा केला आहे. मयंक राजकीय सल्लागार असून भाजपसाठी काम करतात. सर्वेश मेवाडा यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. त्याचबरोबर तेजस चित्रपटात कंगना रनोटने एअरफोर्स ऑफिसरची भूमिका साकारली होती.दरम्यान, मयंक मधुरने बॉलिवूड हंगामाशी संवाद साधला आहे. कंगना रणौतच्या चित्रपटाच्या शूटिंगसाठी परवानगी मिळवण्यात मयंकने टीमची मदत केल्याचा दावा केला. यामध्ये हवाई दलाचे तळ तसेच दिल्ली, मुरादाबाद आणि लखनौ सारख्या ठिकाणांचा समावेश आहे जिथे गेल्या 2 वर्षांपासून परवानगी मिळविण्याचा प्रयत्न केला जात होता परंतु तो अयशस्वी झाला होता. याशिवाय दिग्दर्शक सर्वेश मेवाडा यांनी त्याला वचन दिले होते की, त्याच्यासाठी चित्रपटात 15 मिनिटांची भूमिका ठेवेल. याचे स्पष्टीकरण देताना मयंक मधुर सांगतात, "माझी भूमिका लहान होत गेली. त्यानंतर, मला 1 किंवा 2 मिनिटांसाठी सिनेमात भुमिका करायला सांगितले. मी त्यांना सांगितले की मला त्यात रस नाही."मयंक मधुरने असेही सांगितले की, कंगना राणौतने चित्रपट रिलीज होण्यापूर्वी मला पैसे मिळतील असे वचन दिले होते. आता तीही निर्मात्याकडे बोट दाखवत आहे. याविषयी मयंक माजी सरन्यायाधीशांशी बोललाय. त्याच वेळी, त्यांनी पीएमओ, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि गृह मंत्रालयाशी देखील बोलले आहे जेणेकरून अनेक राज्यांमधून अटक वॉरंट जारी करता येईल. कायदेशीर प्रक्रियेनुसार सर्व काही केले जाईल, असेही ते म्हणाले. हा चित्रपट तेजस गिलची कथा सांगणार आहे. तेजस हा चित्रपट ऑक्टोबरमध्ये प्रदर्शित होणार असून टायगर श्रॉफच्या गणपत चित्रपटाशी टक्कर होणार आहे.

# जुन्याच गाण्याला नवीन चाल

रॉकी और रानी या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर चर्चा रंगली आहे.त्याचा गेल्या काही दिवसांपूर्वी ट्रेलर व्हायरल झाला होता. त्यालाही चाहत्यांचा आणि नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता या चित्रपटातील झुमका गिरा रे नावाचे गाणे प्रदर्शित झाले आहे.गेल्या काही महिन्यांपासून प्रदर्शित झालेल्या चित्रपटांकडे पाहिल्यास त्यातील गाणी ही यापूर्वीचे हिंदी चित्रपट, अन्य भाषांमधील चित्रपटांमधील गाण्याची कॉपी करण्याची लाट आल्याचे चाहत्यांचे, नेटकऱ्यांचे निरीक्षण असल्याचे दिसून आले आहे. पठाणमधील शाहरुखवर बेतलेले झुमे जो पठाण नावाचे गाणे प्रदर्शित झाले होते तेव्हा पाकिस्तानातील एका गायकानं शाहरुखनं आपले गाणे चोरल्याचे म्हटले होते. यानंतर आता रणवीर सिंगचे एक गाणे चर्चेत आले आहे.आलिया भट्ट आणि रणवीर सिंगच्या त्या गाण्याचे बोल झुमका गिरा रे हे असून पूर्वीच्या काळातील एका हिंदी चित्रपटातील या गाण्याची कॉपी करण्यात आल्याचा आरोप नेटकऱ्यांनी मेकर्सवर केला आहे. अनेकांना ते गाणं कमालीचे आवडले आहे. अनेकांनी रणवीर आणि आलियाच्या केमिस्ट्रीला पसंदही केले आहे. रॉकी आणि राणीची कहानी अनेकांच्या कुतूहलतेचा विषय आहे. काही



दिवसांपूर्वी रणवीर सिंगचे तुम क्या मिले नावाचे गाणे प्रदर्शित झाले होते.आता सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या त्या गाण्यानं नेटकऱ्यांना कोड्यात टाकले आहे. ते म्हणजे या गाण्यात रणवीर सिंगचा डान्स सोडता नवीन काय आहे. पूर्वीचीच गाणी फक्त नव्या चालीत सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न असल्याच्या प्रतिक्रिया अनेक नेटकऱ्यांनी दिल्या आहेत. यासगळ्यात काही आलियावरही नेटकऱ्यांनी निशाणा साधला आहे. आलियाच्या व्हाट झुमका हे गाणं अनेकांच्या रागाचे कारण ठरताना दिसत आहे.मेकर्सनं भलेही अन्य कुठल्या गाण्याची जशास तशी कॉपी केलेली नाही. मात्र जी थोडी फार कॉपी आहे त्यात ये जवानी है दिवानीमधील रणबीरच्या बत्तमीज दिल गाण्याची झलक व्हाट झुमकामध्ये दिसून येते. तसेच झुमका गिरा रे गाण्याची चालही जशीच्या तशी वापरण्यात आली आहे. यासगळ्यावर नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया भलत्याच भन्नाट असल्याचे दिसून आले आहे.अरिजित सिंह च्या आवाजातील त्या गाण्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. करण जोहरची निर्मिती असलेल्या या चित्रपटातील दुसरे गाणे प्रेक्षकांची पसंती मिळवताना दिसत आहे.

# कसोटीतील पहिले यशस्वी अर्धशतक!

## जैस्वालची शर्मासोबत पहिल्या विकेटसाठी 105 धावांची भागीदारी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**संघाचा युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल याला वेस्ट इंडिजविरुद्धच्या डॉमिनिका कसोटीत पदार्पण करण्याची संधी मिळाली. यानंतर त्याने पदार्पणाच्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात अर्धशतक झळकावले आहे. देशांतर्गत क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरी आणि त्यानंतर आयपीएल २०२३ मधील त्याच्या चमकदार फलंदाजीमुळे यशस्वी जैस्वालला भारतीय कसोटी संघात स्थान देण्यात आले. आता त्याने कॅरेबियन भूमीवर पहिल्याच सामन्याच्या पहिल्या डावात आपली योग्यता सिद्ध केली आणि अर्धशतक झळकावले.**

या सामन्याच्या पहिल्या डावात यशस्वी जैस्वालने अल्झारी जोसेफच्या चेंडूवर चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. या सामन्यात त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले. त्याने या अर्धशतकासाठी १०१ चेंडूंचा सामना केला.

त्याने कर्णधार रोहित शर्मासोबत पहिल्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी केली आहे. यशस्वीने या डावात अत्यंत संयमाने फलंदाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. जैस्वाल कसोटी पदार्पणातच अर्धशतक झळकावणारा १३वा भारतीय सलामीवीर ठरला आहे. कसोटी पदार्पणात केवळ दोन भारतीय सलामीवीरांनी शतके झळकावली आहेत. सलामीवीर शिखर धवनने २०१३ मध्ये आणि पृथ्वी शॉने २०१८ मध्ये शतक झळकावले होते. एकूण १६ भारतीय फलंदाजांनी कसोटी पदार्पणात शतके झळकावली आहेत, शेवटचे तीन फलंदाज रोहित शर्मा, पृथ्वी शॉ आणि श्रेयस अय्यर यांनी केले आहेत. विशेष म्हणजे हे तिघेही मुंबईसाठी खेळून आले आहेत.

जैस्वाल या यादीत सामील होण्याच्या जवळ आहे. वेस्ट इंडिजच्या भूमीवर १७ वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल या जोडीने सलामीवीर फलंदाज म्हणून शतकी भागीदारी केली. गेल्या १७ वर्षांपासून कसोटी क्रिकेटमध्ये कोणत्याही भारतीय सलामीवीराने असा पराक्रम केला नव्हता. या सामन्याच्या पहिल्या डावात कर्णधार रोहित शर्मने १०६ चेंडूंचा सामना करत आपले अर्धशतक पूर्ण केले. भारताने कोणतेही नुकसान न करता ५५ षटकानंतर बिनबाद १४६ धावा केल्या आहेत.

सध्या रोहित शर्मा ६८ आणि यशस्वी जैस्वाल ६२ धावांवर खेळत आहेत. भारतीय संघ वेस्ट इंडिजच्या तुलनेत ४ धावांनी मागे आहे.



### सलामीवीर फलंदाजाची शतकी भागीदारी

वेस्ट इंडिजच्या भूमीवर १७ वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल या जोडीने सलामीवीर फलंदाज म्हणून शतकी भागीदारी केली. गेल्या १७ वर्षांपासून कसोटी क्रिकेटमध्ये कोणत्याही भारतीय सलामीवीराने असा पराक्रम केला नव्हता. या सामन्याच्या पहिल्या डावात कर्णधार रोहित शर्मने १०६ चेंडूंचा सामना करत आपले अर्धशतक पूर्ण केले. भारताने कोणतेही नुकसान न करता ५५ षटकानंतर बिनबाद १४६ धावा केल्या आहेत.

# रविचंद्रन अश्विनचा ढासू पंच!

## टेस्ट चॅम्पियनशिप फायनल जिंकू शकलो नाही

। रोसेओ ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय संघाचा ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विन सध्या कसोटीत जगातील नंबर वन गोलंदाज आहे. अश्विन कसोटी क्रिकेट फॉरमॅटमध्ये ४५० हून अधिक विकेट्स आहेत. यानंतरही अश्विनला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप जेतेपदाच्या टीम इंडियामध्ये स्थान मिळाले नाही. तो बेंचवर बसला होता आणि भारतीय गोलंदाज विकेट्ससाठी झुंजत होते.**

अखेर भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. आता अश्विनला वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटीसाठी संधी मिळाली. त्याने सामन्याच्या पहिल्याच दिवशी ५ फलंदाजांना माघारी पाठवले. या सामन्यानंतर अश्विनने आपल्या मनातील गोष्ट मीडियासमोर मांडली. ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारताला पराभूत केल्यामुळे निराशा व्यक्त केली. प्रसारमाध्यमांशी बोलताना तो म्हणाला, 'आजकाल क्रिकेट खूप खेळले जात आहे. जगभरात बऱ्याच लीग आहेत. अशा परिस्थितीत वर्तमानात राहणे आवश्यक आहे. मी पण खूप काम करतो. घरी संघ आहे, त्याचीही काळजी घ्यावी लागते. माझ्यासाठी दुःखाची गोष्ट म्हणजे आम्ही वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल जिंकू शकलो नाही. आम्ही दोनदा अंतिम फेरीत पोहोचलो पण जिंकू शकलो नाही. अश्विन म्हणाला – यानंतर आम्हाला नवीन सायकलसाठी वेस्ट इंडिजला यावे लागले. मालिकेची सुरुवात चांगली होणे माझ्यासाठी महत्त्वाचे होते. मी भाग्यवान होतो की माझा पहिला स्पेल चांगला होता. त्यामुळे पुढे गोष्टी घडत गेल्या.



### मग मला राग यायला लागला

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये स्थान न मिळाल्याबद्दल अश्विन म्हणाला - "WTC चा अंतिम सामना सुरु आहे आणि तुम्ही बाहेर बसला आहात, क्रिकेटमध्ये हे खूप कठीण आहे. पण मग मला ड्रेसिंग रूममध्ये बसून राग यायला लागला तर माझ्यात आणि युवा खेळाडूत काय फरक आहे. यावेळी आम्ही कसोटी चॅम्पियनशिप फायनलसाठी गेलो तेव्हा मी शारीरिक आणि मानसिक तयारी नियोजन केले, सर्वकाही केले. याची तयारीही केली होती. तर प्रतिसाद कसा वातावरण खेळण्यासाठी पूर्ण केली. खेळासाठी पण मी खेळणार नाही मी सामना खेळला नाही द्यायचा. ड्रेसिंग रूमचे कसे योग्य ठेवावे, याचीही तयारी केली."

# पार्थचा खडतर सुवर्णप्रवास!

। पुणे ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**एकलव्यने द्रोणाचार्यांना गुरू मानून धनुर्विद्या आत्मसात केली. महाभारतातील अर्जुनाला प्रत्यक्ष द्रोणाचार्यांचे मार्गदर्शन मिळाले. मात्र, या आधुनिक युगातील पार्थला द्रोणाचार्य मिळण्यासाठी वाट पहावी लागली. या पार्थने 'युट्यूब'मार्फत धनुर्विद्येचे धडे गिरवले आणि स्वतःमधील तिरंदाज जागा ठेवला.**

नेमके मार्गदर्शन मिळाल्यावर या पार्थने म्हणजेच साताऱ्याच्या पार्थ साळुंखेने जागतिक नकाशावर आपले नाव कोरले. ऑलिम्पिकमध्ये समावेश असलेल्या रीकर्व्ह प्रकारात पार्थने युवा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून इतिहास घडवला. आयर्लंड येथील युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णयश मिळवलेल्या पार्थचा इथवरचा प्रवास सोपा नव्हता. 'ऑलिम्पिकच्या लढती टीव्हीवर पाहून तिरंदाजीची मला आवड निर्माण झाली. शाळेमध्ये हा खेळ सुरू झाला. हा खेळ शिकण्यासाठी धनुष्यबाणही खरेदी केला होता. मात्र, तिरंदाजी प्रशिक्षकांपर्यंत पोचण्यापूर्वीच ते शाळा सोडून गेले. मग शालेय शिक्षक असलेल्या वडिलांनी धीर दिला आणि त्यांच्यासह 'युट्यूब'वरून या खेळातील बारकावे शिकू लागलो पार्थने सांगितले. कधी घरात, कधी शाळेने उपलब्ध करून दिलेल्या मैदानात, तर कधी शेतात पार्थचे तीर लक्ष्य साधू लागले होते. पार्थच्या या अशा प्रशिक्षणाचा कालावधी थोडाथोडका नव्हता. पार्थने २०१३ ते २०१८ अशी तब्बल पाच वर्षे अशाच पद्धतीने प्रशिक्षण घेतले. याच कालावधीत २०१६ मध्ये पार्थने इंदूरला शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले.